महाराष्ट्र पोलीस

# पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर

तीन हात नाका, एल.बी.एस.मार्ग, नौपाडा, ठाणे (पश्चिम)

दुरध्वनी क्रमांक – ०२२–२५४०१०५६

Email ID – cp.thane.dcptraffic@mahapolice.gov.in

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

जा.क्र. पोउपआ/वावि/अधिसुचना / १७७ /२०२३ दि. १२ /१०/२०२३

## –: वाहतूक नियंत्रण अधिसुचना :–

**ज्याअर्थी,** ठाणे शहरातील वागळे वाहतुक उपविभागाचे हद्दीत दि. १५/१०/२०२३ ते दि. २४/१०/२०२३ या कालावधीत **संकल्प चौक** या ठिकाणी **'नवरात्रौत्सव'** निमित्त **'रासरंग गरबा'** चे आयोजन करण्यात आले आहे. सदर कार्यक्रमाकरीता अति महत्वाच्या व्यक्ती मोठया प्रमाणात उपस्थित राहणार आहेत. सदर परिसरात वाहतूक कोंडी होऊ नये व परिसरातील वाहतूक सुरळीत व सुनिश्चित राहणे आम जनतेच्या सोईसाठी आवश्यक आहे.

**त्याअर्थी,** मी, **डॉ. विनयकुमार मे. राठोड, पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर** म्हणून, मला महाराष्ट्र शासन गृहविभाग क्र. एम.व्ही.ए.–११६/सीआर/३७/टीआर, दि. २७/०९/१९९६ चे अधिसूचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६ (१)(अ)(ब) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून पुढीलप्रमाणे अधिसूचना जारी करीत आहे. :–

**प्रवेश बंद –** १) संकल्प चौक कडून रहेजा कडे जाणा–या सर्व प्रकारच्या वाहनांना **संकल्प चौक** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** सदर वाहने संकल्प चौक येथून हाजुरी, जुना पासपोर्ट मार्गे डावे वळण घेवून पुढे इच्छित स्थळी जातील.

**प्रवेश बंद –** २) रहेजा कडून संकल्प चौक कडे जाणा–या सर्व प्रकारच्या वाहनांना **रहेजा चौक** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** सदर वाहने तीन हात नाका येथून साईमास हॉटेल कडून डावे वळण घेवून पुढे इच्छित स्थळी जातील.

सदरची अधिसुचना दि. १५/१०/२०२३ ते दि. २२/१०/२०२३ रोजी १६.०० वा. ते रात्रौ २२.०० वाजेपावेता आणि दि. २३/१०/२०२३ ते दि. २४/१०/२०२३ रोजी १६.०० वा. ते रात्रौ २४.०० वाजेपावेता अंमलात राहील.

सदरची अधिसुचना फायर ब्रिगेड, रूग्णवाहिका, पोलीस वाहने व इतर अत्यावश्यक सेवेतील वाहनांना लागू होणार नाही.

**( डॉ. विनयकुमार मे. राठोड )**
पोलीस उप आयुक्त,
वाहतूक विभाग, ठाणे शहर.

**प्रति,**

जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय, ठाणे.
२/– सदरची अधिसुचना प्रसिध्द करण्यास विनंती आहे.

**प्रत माहितीसाठी सविनय सादर,**

जिल्हाधिकारी, ठाणे
आयुक्त, ठाणे महानगरपालिका, ठाणे.
अपर पोलीस आयुक्त, पश्चिम प्रादेशिक विभाग, ठाणे.
प्रादेशिक परिवहन अधिकारी, ठाणे.
पोलीस उप आयुक्त, परिमंडळ–५/विशेष शाखा, ठाणे.
परिवहन व्यवस्थापक, ठाणे महानगरपालिका, ठाणे.
विभाग नियंत्रण कक्ष, राज्य परिवहन विभाग, ठाणे.
नियंत्रण कक्ष, ठाणे शहर
ठाणे पोलीस पत्रक.

**प्रत माहिती व कार्यवाहीसाठी,**

स.पो.आ. ठाणे वाहतूक विभाग,/पोनि वागळे, कापूरबावडी, राबोडी, नौपाडा, वाहतूक उपविभाग.